# चाळीसगांव नगरपरिषद, चाळीसगांव
# जि. जळगांव

## मिळकत विभाग

## सन २०२६-२७

**कामाचे नाव :-** चाळीसगांव नगरपरिषद हद्दीतील आठवडे बाजार व डेली / गुजरी बाजार फी वसुली मक्ता देणेबाबत.

# जाहीर ई-लिलाव सुचना

तमाम व्यापारी मक्तेदार यांना कळविण्यात येते की, चाळीसगाव नगरपरिषद हद्दीतील आठवडे व डेली / गुजरी बाजार फी वसुली मक्ता १९ मे २०२६ पासून ते १८ मे २०२७ पर्यंत या कालावधी साठी देणे कामी जाहीर ई-लिलावाचे आयोजन करण्यात येत आहे.

ई-लिलावाबाबतचा अधिक तांत्रिक तपशिल व ई-लिलाव प्रणालीबाबत काही शंका असल्यास चाळीसगांव नगरपरिषदेच्या मिळकत विभाग येथे संपर्क साधावा.

**सदर ई-लिलावाचा तपशिल खालील प्रमाणे**

१) चाळीसगाव नगरपरिषद हद्दीतील आठवडे व डेली / गुजरी बाजार फी वसुली मक्ता ई-लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ इच्छित असलेल्या लिलावधारकांना **https://mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर सविस्तर तपशिल उपलब्ध आहे.

२) ई-लिलावात भाग घेणा-यांनी आपला युजरनेम व पासवर्ड नोंदणी करुन घेणे आवश्यक राहील. तसेच स्वतः चे डिजीटल सिग्नेचर कि (Digital Signature Key) वापरुन ई-लिलावात भाग घेणे आवश्यक राहील.

३) ई-लिलावचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | मक्ता तपशील | कालावधी | सुरक्षा अनामत | सरकारी किंमत |
|---|---|---|---|---|
| A | B | C | D | E |
| १ | नगरपरिषद हद्दीतील आठवडे बाजार फी वसुली | ०१/०६/२०२६ पासून ते ३१/०५/२०२७ पर्यंत | ५०,०००/- | ३,३०,०००/- |
| २ | नगरपरिषद हद्दीतील डेली / गुजरी बाजार फी वसुली | ०१/०६/२०२६ पासून ३१/०५/२०२७ पर्यंत | ५०,०००/- | १७,१६,८१२/- |

सदर मक्त्यासाठी रकाना E मध्ये नमूद किमान सरकारी किमतीवर महत्तम ई-लिलाव बोली बोलायची आहे. योग्य रक्कम न मिळाल्यास सदर ई-लिलाव रद्द करण्याचे अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

४) **ई-लिलाव प्रक्रियेचे दोन भाग राहतील :-**

अ) ई-लिलावात बोली बोलणेसाठी पात्रता मिळविणे :- कालावधी दि.१६/०५/२०२६ ते दि.२१/०५/२०२६

ब) ई-लिलावात पात्र झालेनंतर प्रत्यक्ष ई-लिलावात बोली बोलणे :- कालावधी दि.२८/०५/२०२६

**अ) ई-लिलावात बोली बोलणेसाठी पात्रता मिळविणे :-**

ई-लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी **https://mahatenders.gov.in** संकेतस्थळावर जाऊन ई-लिलावात भाग घेणेची पात्रता मिळवणेसाठी आपणास आवश्यक दस्ताऐवजाची पूर्तता करावी लागेल. यामध्ये संकेतस्थळावरील ई-लिलावाचा फॉर्म प्रिंट करुन ई-लिलावाच्या अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे सदर फॉर्मवर (परिशिष्ठ - अ) स्वाक्षरी करून पुन्हा हा फॉर्म संकेतस्थळावर अपलोड करावा लागेल. तसेच ई-लिलाव बोली अनामत रक्कम रुपये ५००००/- याप्रमाणे संकेतस्थळावर भरावी तसेच भरलेली पावती स्कॅन करुन संकेतस्थळावर अपलोड करावी लागेल. तसेच आधार कार्ड, पॅनकार्ड, अनामत भरलेली पावती, रहिवाशी प्रमाणपत्र (पुरावा), मालमत्तेचे उतारे इ. कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक राहील. ई- लिलावासाठी आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड न केल्यास आपणास ई-लिलाव प्रक्रियेतून बाद करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**ब) ई-लिलावात पात्र झालेनंतर प्रत्यक्ष ई-लिलावात बोली बोलणे :-**

दि.२२/०५/२०२६ पर्यंत उपरोक्त मधील बाबींची पूर्तता केलेल्या लिलाव धारकांना ई-लिलावात बोली बोलणेसाठी पात्र केले जाईल व त्यानंतर दि.२८/०५/२०२६ पासून ते दि.२८/०५/२०२६ या कालावधीत ई-लिलावात

भाग घेणेसाठी पात्र असणाऱ्यांना लिलावात ई-बोली बोलता येईल. तसेच ई-लिलाव बोली बोलतांना रु. ५०००/- चे पटीत बोलावी लागेल.

दि.२१/०५/२०२६ पर्यंत सायंकाळी ३:०० वाजेपर्यंत लिलाव धारकांना ई-लिलाव प्रक्रियेमध्ये पात्र होणेसाठी उपरोक्त नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करावी लागेल. ई-लिलाव प्रणालीच्या तांत्रिक मार्गदर्शनासाठी मदत नियंत्रण कक्ष Help Desk ची व्यवस्था नगरपरिषद कार्यालयात करण्यात आलेली आहे.

ई-लिलाव बोलीबाबत इतर अटी शर्ती **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर फॉर्मवर उपलब्ध आहे. सदर अटी व शर्ती संबंधितांनी काळजीपूर्वक वाचाव्यात, सदर अटी व शर्तीबाबत नंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

| अ.क्र. | तपशील | कालावधी | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | दस्ताऐवज डाउनलोड व अपलोड करण्याची दिनांक | दिनांक:-१६/०५/२०२६ सकाळी १०:०० | दिनांक:-२१ /०५/२०२६ सायं. ०३:०० |
| २ | ऑनलाईन / ई. लिलाव उघडणे दिनांक | दि२२/०५/२०२६ दुपारी ०५:०० | दिनांक:-२२/०५/२०२६ दुपारी ०५:०० |
| ३ | ऑनलाईन / ई. लिलाव बोलीची दिनांक | दिनांक:-२८/०५/२०२६ सकाळी ११:०० | दिनांक:-२८/०५/२०२६ दुपारी ०२:०० |

मुख्याधिकारी
नगरपरिषद, चाळीसगांव

Signature Not Verified
Digitally signed by Devendra Ashok Shinde
Date: 2026.05.15 16:55:16 IST
Location: Maharashtra-MH